**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विदयापीठ,**
**महिला विदयापीठ**
**चर्चगेट, मुंबई – २०**

Abbi. Gen. 1) circular/2016-17/147

दिनांक: २०/४/२०१६

परिपत्रक :

**विषय** : पदवी महाविदयालयातील प्राचार्यांच्या उपस्थितीबाबत.
**संदर्भ** : मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालयाकडील पृष्ठांकन
१. क्र.मंत्री/शा.शि.क्री/साधारण क्र.३६०/१६, दिनांक १६/०२/२०१६.
२. सहसं/उशि/प्राचार्य उपस्थिती/कोविंप/२०१६/८२५, दिनांक २३/०३/२०१६.

मा. महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविदयालयांच्या प्राचार्यांस उपरोक्त विषयास अनुसरून आपणास असे कळविण्यात येते की, महाविदयालयाच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पुर्णवेळ आपली महाविदयालयात उपस्थिती आवश्यक व महत्वपूर्ण आहे. तसेच हजेरी पुस्तकावर आपली स्वाक्षरी व बायोमॅट्रिक पध्दतीने उपस्थितीची नोंद ही आवश्यक आहे.

आपल्या उपस्थितीची सत्यता पडताळणी होण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण हे शासन निर्णय दिनांक १७/०५/१९९४ नुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये विभागाचे नियंत्रण अधिकारी म्हणून केव्हाही आणि कोणत्याही महाविदयालयास कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत भेट देऊ शकतील याची कृपया नोंद घ्यावी. तरी अती महत्वाचे तसेच यु.जी.सी, विदयापीठ आणि शासन स्तरावरील पुरस्कृत काही शैक्षणिक कार्यक्रम अथवा नियोजीत सभा/बैठका/परिषदा इत्यादि असतील अशी अपवादात्मक परिस्थिती वगळता आपली पूर्णवेळ उपस्थिती अनिवार्य आहे.

आपली विश्वासु,

(डॉ. मधुरा केसरकर)
संचालक
(महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ)

D/pallavi 2014-15/Affiliation (pallavi)/Letter/Marathi Letter

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

***शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.***

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com    दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.


क्र. सहसं/उशि/प्राचार्य उपस्थिती /कोविप/२०१६ / ८२५    दिनांक :-२३/०३/२०१६


S.N.D.T.W. UNIVERSITY
MUMBAI-20.
11 APR 2016
In. No. 02
Registrar Office


प्रति,
प्राचार्य,
सर्व अधिनस्त कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी तसेच अध्यापक महाविद्यालये ठाणा, पालघर,
रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हे.

— BCUD

**विषयः- पदवी महाविद्यालयातील प्राचार्यांच्या उपस्थितीबाबत.**

संदर्भः- मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालयाकडील पृष्ठांकन
क्र.मंत्री/शा.शि.क्री./साधारण क्रं.३६०/१६, दिनांक १६/०२/२०१६

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालयाकडील निर्देश होऊन आलेल्या संदर्भिय पत्राची प्रत सहपत्रीत करण्यात येत आहे. त्याचे प्राधान्याने अवलोकन व्हावे.

पदवी महाविद्यालयांमधील प्राचार्यांकडे विद्यापीठ परिनियमानुसार तसेच यु.जी.सी.आणि शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या मार्गदर्शक तत्वांनुसार त्या-त्या महाविद्यालयांच्या प्रशासकीय, वित्तीय तसेच शैक्षणिक जबाबदा-या सोपविण्यात आलेल्या आहेत. हे आपणांस विदीत आहेच त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रत्येक कार्यालयीन कामाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या पूर्ण वेळ महाविद्यालयात उपस्थित असणे तितकेच आवश्यक आणि महत्वपूर्ण आहे. तथापि श्री.सुशिल सदाशिव वेल्हाळ, शृंगारतळी, ता. गुहागर जि.रत्नागिरी यांनी त्यांच्या दिनांक २९/०१/२०१६ च्या पत्रान्वये विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांबाबत काही गंभीर स्वरुपाच्या बाबी तसेच प्राचार्यांकडून हजेरी पुस्तकावर स्वाक्षरी न होणे, बायोमेट्रिक पध्दतीने उपस्थिती नोंद न करणे महाविद्यालयांमध्ये प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाच्या वेळेत उपस्थित न राहणे या सारख्या काही प्रकरणी प्रकाश झोत टाकून मा.मंत्री महोदय यांच्या निदर्शनास आणले आहे.त्यामुळे सदर बाब ही शैक्षणिक दृष्टया अतिशय चिंताजनक आहे.

प्रस्तूत प्रकरणी मा.मंत्री महोदयांकडून तसे निर्देश देण्यात येवून कार्यवाही करण्याबाबतही सूचित करण्यात आले आहे. या विषयी आपणांस असेही कळविण्यात येते की, सदर प्रकरणी कुठे तथ्यांश आढळून आल्यास त्याबाबत गांर्भियाने दखल घेऊन कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी प्रस्तुत प्रकरणी सत्यता पडताळणी होण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, हे शासन निर्णय दिनांक १७/०५/१९९४ नुसार प्रदान केलेल्या अधिकारांन्वये विभागाचे नियंत्रण अधिकारी म्हणून केंव्हाही आणि कोणत्याही महाविद्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत भेट देऊ शकतील याचीही शक्यता नाकारता येत नाही. तरी अति महत्वाचे तसेच यु.जीसी, विद्यापीठ आणि शासन स्तरावरील पुरस्कृत काही शैक्षणिक कार्यक्रम अथवा नियोजीत सभा / बैठका / परिषदा इत्यादि असतील अशी अपवादात्मक परिस्थिती वगळता आपण पूर्ण वेळ महाविद्यालयात उपस्थित रहाल अशी आशा आहे.

RBhosley
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग,पनवेल

प्रत, माहितीस्तव सादर,

संचालक
(महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ)

D/pallavi 2014-15/Affiliation (pallavi)/Letter/Marathi Letter